# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग

## परिपत्रक

क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२३-२४/४१०.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(न) [28(2)(t)] अन्वये १० नोंदणीकृत पदवीधर मतदारसंघाना निवडून देण्याकरीताच्या अंतिम मतदार याद्या (सुधारित) दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ रोजी विद्यापीठ शुध्दीपत्रक क्र.नि.वि. /आयसीडी/२०२३-२४/३८७, दि. ०९ ऑगस्ट, २०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच नोंदणीकृत पदवीधर मतदार संघांकरीता नामनिर्देशन भरण्याबाबत निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/३९८, दिनांक ०९ ऑगस्ट, २०२३ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिसुचनेनुसार ऑनलाईन पद्धतीने एका अर्जदार त्याच्या स्वत:च्या प्रवर्गाप्रमाणे एकदाच नामनिर्देशन अर्ज भरता येतो. जर एका अर्जदाराला एकाच प्रवर्गामध्ये एकापेक्षा अधिक नामनिर्देशन अर्ज भरावयाचे असल्यास Election portal च्या www.mu.eduapp.co.in या website वर जावून forms या Tab वर click करून कोऱ्या (Blank) अर्जाची Printout काढावी व सदर अर्ज ऑफलाइन पद्धतीने विहित नियमानुसार परिपूर्ण (Complete in all respect) भरून शुल्क रू. ५००/- कक्ष क्रमांक १३, रोख विभाग, वित्त व लेखा विभाग, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे जमा करावी. तद्नंतर शुल्क भरल्याची पावतीसह अर्ज **शुक्रवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत रूम नं. ११०, निवडणूक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सुट्टीचे दिवस वगळून) आवश्यक त्या कागदपत्रांसह** जमा करावेत.

कृपया सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : १० ऑगस्ट, २०२३.
ठिकाण : मुंबई- ४०० ०३२.